श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-८ | ऑगस्ट-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४ |

## डेरवण शाळेत अटल टिंकरींग लॅबोरेटरीचे उद्‌घाटन

दि.१ जुलै २०१८ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, डेरवण येथे भारत सरकारच्या 'नीती आयोग अटल इनोव्हेशन मिशन'मार्फत अटल टिंकरींग लॅबोरेटरी (ATL) चे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे हस्ते करण्यात आले. तसेच ४० संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा यांनी युक्त अद्ययावत संगणक कक्ष व विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्यांचा परिपूर्ण विकास करण्यासाठी साकारलेले भव्य कला दालन यांचेही उद्‌घाटन डॉ.करमळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रयोगशाळांच्या उद्‌घाटनानंतर इ.६ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांनी तेथे विविध वैज्ञानिक प्रयोग जसे Obstacle avoiding robot, DIY Drone, Arduino based moisture sensor, rain drop sensor, capacitive touch sensor, temperature sensor, Bluetooth based robot आणि 3-D Printer यांचे प्रात्यक्षिक सादर केले. प्रेक्षकांच्या प्रश्नांना विद्यार्थी आत्मविश्वासाने उत्तरे देत होते. डॉ. करमळकर यांनी विद्यार्थ्यांशी विचारांचे आदान प्रदान करून प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी ATL च्या कार्यपद्धतीचे विवरण करताना सांगितले की, शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व विज्ञान विषयक उपक्रमांमधील सहभाग पारखून भारत सरकार मार्फत 'अटल टिंकरींग लॅबोरेटरी' स्थापन करण्यासाठी निवड झालेली रत्नागिरी जिल्ह्यातील ही दुसरी शाळा आहे. इ. ६ वी ते १२वीतील तरुण विद्यार्थ्यांच्या मनातील कुतूहल, सर्जनशीलता, कल्पकता, संगणकीय विचार प्रक्रिया, नवोपक्रम कौशल्य विकसित करणे हे ATL चे मुख्य उद्दिष्ट आहे. वैज्ञानिक, तांत्रिक, अभियांत्रिकी व गणितीय संकल्पना समजून घेऊन विद्यार्थ्यांना अत्याधुनिक उपकरणे जसे की 3D Printer, Robot kits, Electronic tools, IoT & Sensors इ. साधने हाताळण्याची व नवनवीन वैज्ञानिक प्रयोग करून बघण्याची संधी येथे मिळेल. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची संधी व नवनिर्मिती चा आनंद मिळेल.

शाळेतील वैज्ञानिक कार्यशाळांना सतत मार्गदर्शन करणारे डॉ. चंद्रशेखर गर्दे यांनी राष्ट्रीय दर्जाची लॅब येथे स्थापन झाल्याबद्दल




*अटल टिंकरींग लॅबोरेटरी (ATL) चे उद्‌घाटन करताना 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'चे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सोबत श्रीकाका महाराज जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर*

शाळेचे अभिनंदन केले. ATL च्या कार्यामागील तत्त्व सांगताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना वयाच्या २० व्या वर्षानंतर ही उपकरणे दिली तर त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्या अगोदरच विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, वेगळा विचार करण्याची क्षमता जास्त असते. त्यामुळे ह्या वयात पाठांतराने शिकण्यापेक्षा वैज्ञानिक उपकरणे हाताळून, जाणिवेतून, संकल्पना समजून शिकणे महत्त्वाचे आहे आणि ते ATL मुळे शक्य होईल. ATL मध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळेल, अपयशातून शिकण्याची तसेच राष्ट्रीय पातळीवर प्रयोग सादर करण्याची संधी मिळेल.

उद्घाटन समारंभाचे वेळी संस्थेचे विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर म्हणाले की, श्री सद्गुरू दिगंबरदास महाराज यांनी १९६९ साली स्थापन केलेल्या श्रीसंत सितारामबुवा वालावलकर चॅरिटीज ट्रस्टचे हे ५० वे वर्ष असून याच वर्षात शाळेच्या या वैज्ञानिक उपक्रमाला सुरूवात होत आहे हे औचित्याचे आहे. ट्रस्ट स्थापन करण्यामागील उद्दिष्ट म्हणजे प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य प्राप्त करून देणे व फळाची चिंता न करता कर्म करत राहणे हे आहे. या उद्देशांना समोर ठेवून या ट्रस्टने हॉस्पिटल, शाळा, मेडिकल कॉलेज, क्रीडासंकुल या सर्वांची स्थापना करून समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी वैज्ञानिक संशोधन हे काळाची गरज बनले आहे. 'अटल टिंकरींग लॅब'च्या साहाय्याने विद्यार्थ्यांची विज्ञान व तंत्रज्ञानातील गोडी वाढेल. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना सत्यात उतरवण्यासाठी येथे संशोधन करावे. दैनंदिन जीवनात वापर करता येईल व परिसरातील समस्यांचे निराकरण होईल अशी उपकरणे तयार करावीत यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नितीन करमळकर हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, ''डेरवण सारख्या छोट्याशा गावात ही संस्था गेली ५० वर्षे अविरत काम करत आहे. गेले दोन दिवस




*उद्घाटन समारंभाचे वेळी बोलताना संस्थेचे विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर*

मी संस्थेचे विविध उपक्रम पहातो आहे. येथील इंग्रजी माध्यमाची शाळा, तेथील लहान मुलांबरोबर संवाद, मेडिकल कॉलेज, हॉस्पिटलमधील सोयी सुविधा, क्रीडासंकुल हे सर्व पाहण्याकरिता दोन दिवस फारच कमी आहेत. या संस्थेकडून शिकण्यासारखे खूप आहे. येथील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मी असे सांगेन की शिक्षकांनी वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद साधावा, विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, स्वतंत्र विचार करण्याची मुभा द्यावी, तरच नवनिर्मिती घडेल.

विद्यार्थ्यांनी देखील आजूबाजूच्या परिसराचे निरिक्षण करावे. निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे. निसर्गात अव्याहतपणे घडणाऱ्या घटनांची कारणमीमांसा करावी, संशोधन करून नवी उपकरणे तयार करावीत व ती बाजारात आणावीत. विद्यार्थ्यांनी स्वत:चे उद्योग निर्माण करावेत. नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा. या संस्थेने तुम्हाला घडवले आहे, पुढे जाऊन आपण या समाजाला काय देता येईल याचा विचार करा.'' संस्थेच्या सर्वच उपक्रमांचे त्यांनी भरभरून कौतुक केले व त्यांच्याकडून कोणतीही मदत लागल्यास ती आनंदाने करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

# डेरवण रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया सुरू

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्रात जानेवारी २०१८पासून 'बजाज फिनसर्व्ह'च्या सहकार्याने उभारलेल्या 'कॅथलॅब सेंटर'मध्ये 'ॲन्जिओग्राफी' व 'ॲन्जिओप्लॅस्टी'ची सुरवात झाली. त्यानंतर 'बजाज फिनसर्व्ह'च्याच सहकार्याने ९ जून २०१८ पासून रुग्णालयाने अत्यंत अद्ययावत 'कार्डिॲक थिएटर' सुरू करून ओपन हार्ट सर्जरी अर्थात बायपास, हृदयाच्या झडपा बदलणे, छिद्र बुजविणे या प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यास सुरवात करून वैद्यकीय सेवा क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे.

आजपर्यंत रुग्णालयाच्या कार्डिॲक विभागात २७० ॲन्जिओग्राफी व ५४ ॲन्जिओप्लास्टी, १ परमनंट पेसमेकर, आणि नुकत्याच सुरू झालेल्या कार्डिॲक थिएटरमध्ये ३ बायपास शस्त्रक्रिया, १ व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट, १ एएसडी क्लोजर या शस्त्रक्रिया डॉ. आनंद नाडकर्णी, पुणे (कार्डिॲक सर्जन) व त्यांचे सहकारी यांनी यशस्वीरित्या केल्या. वालावलकर रुग्णालयातील अत्याधुनिक यंत्रणेने सुसज्ज असलेले कार्डिॲक ऑपरेशन थिएटर अमेरिका, युरोप व 'एन.ए.बी.एच.' च्या मापदंडांप्रमाणे आहे. पुणे, मुंबई, दिल्ली, मद्रास, बेंगलोर अशा मोठ्या शहरात मिळणारी ही अत्युच्च

दर्जाची जीवनाश्यक सेवा आता कोकणात या रुग्णालयात सुरू झाली आहे. हृदयाच्या कोणत्याही उपचारासाठी आता कोकणातील रुग्णांना कोकणाबाहेर जावे लागणार नाही. ज्या रुग्णांकडे केशरी व पिवळे रेशन कार्ड आहे त्यांना, शासनाच्या 'महात्मा फुले जीवन आरोग्य योजने'खाली सर्व उपचार मोफत उपलब्ध होणार आहेत.

आंबतखोल येथील एका पेशंटच्या हृदयाच्या एका झडपेचे ऑपरेशन आधी झालेले होते. पुन्हा त्रास व्हायला लागला म्हणून त्यांना डेरवण येथे आणल्यावर त्वरीत ॲन्जिओप्लास्टी करण्यात आली आणि आता त्यांच्या हृदयाच्या दुसऱ्या झडपेचेही ऑपरेशन करण्यात आले आहे आणि आता त्यांची तब्येत उत्तम आहे. त्यांचे सोबत आलेले त्यांचे सुपुत्र म्हणाले की डेरवणला ही सोय झाल्यामुळे आम्हाला सर्वच दृष्टीने हे ऑपरेशन सोयीचे ठरले. या सोयीबद्दल रुग्णालयाचे आम्ही अत्यंत आभारी आहोत असे ते म्हणाले. अशाच प्रकारच्या अनेक प्रतिक्रिया रुग्णांकडून आणि त्यांच्या नातेवाईकांकडून आल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात हृदयाच्या आजारावर ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी, पेस मेकर, डिव्हाईस क्लोजर, लहान मुलांच्या हृदयाचे छिद्र बुजविण्याचे बिन टाक्याचे ऑपरेशन अशा सर्व



*डेरवण हॉस्पिटलमध्ये 'कार्डिॲक थिएटर' सुरू होऊन ओपन हार्ट सर्जरीला यशस्वी सुरुवात*

प्रकारच्या शस्त्रक्रिया प्रथमत:च वालावलकर रुग्णालयात सुरू झाल्यामुळे आता कोकणातील रुग्णांना पुणे, मुंबई या ठिकाणी जाण्याची गरज पडणार नाही. 'वालावलकर रुग्णालयाने सर्व सोई येथेच केल्यामुळे सर्वांना संजिवनी देणारे हे रुग्णालय आहे.' असे उद्गार रुग्णालयात ॲन्जिओप्लास्टी झालेल्या टेटवली ता. दापोली येथील एका पेशंटने काढले.

# त्रिवार अभिनंदन!

कर्करोगतज्ज्ञ डॉ. श्रीपाद बाणावली हे 'भ. क. ल. वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण' येथे रुग्णालयाच्या स्थापनेपासूनच कर्करोगग्रस्त रुग्णांवर उपचार करीत आहेत. मातृभूमीच्या सेवेसाठी अमेरिकेतील आपली बहरती कारकिर्द सोडून भारतात परत आलेले डॉ. बाणावली हे मुंबईच्या 'टाटा मेमोरिअल हॉस्पिटल'मध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नाने कोकणातील कर्करोग रुग्णांच्या सर्वेक्षण आणि उपचारांसाठी टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी आणि वालावलकर रुग्णालय यांच्या सहकार्याने डेरवण येथे अद्ययावत कर्करोग उपचारकक्ष उभारण्यात आला आहे. डॉ. श्रीपाद बाणावली प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी डेरवण येथे येऊन कर्करोगी रुग्णांची तपासणी आणि उपचार करतात. डॉ. श्रीपाद बाणावली याना टाटा मेमोरिअल हॉस्पिटलच्या 'हेड ऑफ ऑन्कोलॉजी डिपार्टमेंट' या पदावरून बढती मिळून आता ते हॉस्पिटलचे 'डायरेक्टर ऑफ ॲकॅडेमिक्स' झाले आहेत. वालावलकर रुग्णालयाच्या वतीने डॉ. सुनील नाडकर्णी यांच्या हस्ते डॉ. श्रीपाद बाणावली यांचा दि. २१ जुलै २०१८ रोजी हृद्य सत्कार करण्यात आला. डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या यशाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि भावी कारकिर्दीविषयी लाखलाख शुभेच्छा!



*डॉ. श्रीपाद बाणावली यांचा सत्कार करताना डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य*



*पहिली जिल्हास्तरीय 'बी. के. एल. वालावलकर बॅडमिंटन टुर्नामेंट' राष्ट्रीय क्रीडापटू सरोज सावंत आणि चारुहास जोगळेकर (डावीकडून चौथे) यांच्या हस्ते पारितोषिक वितरण*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# वालावलकर बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात संपन्न

'एसव्हीजेसीटी स्पोर्ट्स ॲकॅडमी', डेरवण येथे पहिल्या जिल्हास्तरीय 'बी. के. एल. वालावलकर बॅडमिंटन टुर्नामेंट' चे आयोजन दि. २१ आणि २२ जुलै रोजी करण्यात आले होते. रत्नागिरी जिल्ह्यातील बॅडमिंटन खेळाडूंना डेरवण येथील आंतराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन कोर्टवर खेळता यावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पाच वयोगटात म्हणजे १०/१३/१५/१७ आणि १९ वर्षाखालील मुले व मुलींसाठी घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेसाठी रुपये ३५ हजाराची रोख पारितोषिके तसेच पदके/प्रशस्तीपत्रके देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातील ७० नामांकित खेळाडू सहभागी झाले होते. दर्जेदार खेळाने लहान वयोगटातील खेळाडूंनीसुद्धा उपस्थित प्रेक्षकांची मने जिकली. रविवारी दुपारच्या सत्रात पार पडलेल्या सर्व गटाच्या अंतिम सामन्यासाठी रत्नागिरी, चिपळूण, संगमेश्वर येथील ग्रामस्थ आवर्जून उपस्थित होते. अत्यंत रंगतदार ठरलेल्या १९ वर्षाखालील गटाच्या मुलांच्या विजेतेपदासाठी झालेल्या सामन्यात अनुरूप भगत विरुद्ध राजस महोगावकर या दोघांनीही अप्रतिम खेळ करून सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. मागील वर्षी राज्यस्तरीय स्पर्धेत उपविजेती ठरलेल्या १७ वर्षीय श्रुती फणसे हिनेही आपल्या जोरदार 'स्मॅश' आणि प्रतिस्पर्ध्याला कोर्टवर पळायला लावणारे 'ड्रॉप्स' यांचे कौशल्य दाखवून रत्नागिरी जिल्हाही बॅडमिंटनमध्ये कमी नाही हे दाखवून दिले. आमच्या खेळाडूंना खेळण्यासाठी केवळ उत्तम कोर्टच नव्हे तर आता आवर्जून सहभागी व्हावे अशी स्पर्धाही संस्थेने उपलब्ध केली यासाठी आलेल्या पालकांनी संस्थेचे आभार मानले.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून ऑगस्ट २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०४ ऑगस्ट | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टीक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया |
| १७/१८ऑगस्ट | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १८ ऑगस्ट | डॉ. श्रीपाद बाणवली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १८ ऑगस्ट | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| १८ ऑगस्ट | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग शस्त्रक्रिया व उपचार |
| १९ ऑगस्ट | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ, तपासणी व उपचार |
| ०५ ऑगस्ट | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ०५ ऑगस्ट | डॉ.अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| | डॉ.आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाच्या विकाराचे तज्ज्ञ |
| | डॉ.संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रूग्णालय येथे भेटतील. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे. डॉ.सानिश शृंगारपुरे (युरोलॉजिस्ट) दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी.**

**डोहाळेजेवण व सासू सून मेळावा –** १८ ऑगस्ट – वालावलकर रुग्णालय येथे, २४ ऑगस्ट – RHTC येथे

**सहा महिन्यांचे वाढदिवस –** १५ ऑगस्ट – RHTC येथे, २८ ऑगस्ट – वालावलकर रुग्णालय येथे । **सरपंच मेळावा –** २२ ऑगस्ट

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.

**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर